# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/०३/२०२४ (मंगळवार) सकाळ**

---

## अवैधरीत्या दारुची तस्करी करणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई

दिनांक २४/०३/२०२४ रोजी पोस्टे सावनेर येथील स्टाफ यांना मुखबिरद्वारे विश्वसनिय खबर मिळाली की, बस स्टॅंड मागे सावनेर येथुन एक ईसम पायदळ एका गुलाबी रंगाच्या प्लास्टीक थैलीमध्ये विदेशी दारून घेवुन जात आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून स्टाफने घटनास्थळी नाकाबंदी केली असता **आरोपी नामे– विवेक नथ्थुजी दुधाने वय ३४ वर्ष रा. नागमंदीर जवळ ता सावनेर जि नागपुर बस स्टॅंड चे मागे** याचे ताब्यातून विदेशी दारु १) ROYAL CHALLENG च्या १८० एम एल च्या ०५ निपा किमती ९००/–रु २) IMPERIAL BLUE च्या ३६० एम एल च्या ०६ निपा किमती २२४०/–रु ३) IMPERIAL BLUE च्या १८० एम एल च्या ०१ निपा किमती १८०/–रु ४) OFFICERS CHOICE BLUE च्या १८० एम एल च्या ०१ निपा किमती १५०/–रु असा एकुण ३४७०/–रु माल जप्त केला. आरोपीविरूद्ध कलम ६५(ई)(अ) म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद आहे.

आरोपी नामे– दिलीप तेजराम कोहळे वय ४३ वर्ष रा. चानपा ता. सावनेर जि नागपुर याचे घराचे मागिल जागेची दारुबाबत झडती घेतली असता एका पांढ–या रंगाचे पिशवीमध्ये १८० एम एल नी भरलेल्या देशी दारु भिंगरी संत्रा नं. १ च्या २१ निपा किं. १४७० रु तसेच ९० एम एल नी भरलेल्या देशी दारु भिंगरी संत्रा नं. १ च्या ७७ निपा किं. २६९५/– रु एकुण तसेच ०५ बॉटल किमती ९००/रु प्रमाणे एकुण किमंती ४१६५/रू चा माल अवैध्यरित्या मिळुन आल्याने आरोपिचे कृत्य कलम ६५(ई)(अ) म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद आहे.

आरोपी सुरज उर्फ हुक्क महादेव कडु, वय २२ वर्ष रा. वार्ड नं. ५ कुंभार मोहल्ला पाटनसावंगी ता सावनेर जि. नागपुर हा हजर असलेल्या ठिकाणाची दारुबाबत झडती घेतली असता एका खाकी रंगाचे खोक्यात १८० एम एल नी भरलेल्या देशी दारु संत्रा नं. १ च्या ४८ निपा किं. ३३६०/रु चा माल अवैध्यरित्या मिळुन आल्याने आरोपिविरूद्ध कलम ६५(ई) (अ) म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद आहे.

आरोपी फिरोज उस्मान खान वय ४५ वर्ष रा. समता नगर राजेश किरणा स्टोर्स जवळ जरीपटका जि. नागपुर हा हजर असलेल्या ठिकाणाची दारुबाबत झडती घेतली असता एका पांढ–या रंगाचे चुंगडीत १८० एम एल नी भरलेल्या IMPERIAL BLUE विदेशी दारुच्या निपा किं. ११९०/रु चा माल तसेच आरोपीचे घरझडतीत १० निपा देशी दारु ज्यात प्रत्येकी १८० एम एल अशा एकुण १८०० एमएल देशी दारु किं.७००/रु चा माल अवैध्यरित्या विनापरवाना मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन गुन्हा नोंद करुन आरोपिविरूद्ध कलम ६५(ई) (अ) म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ पोस्टे सावनेर येथील रविंद्र मानकर व त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

## शुल्लक वादावरून वडीलानेच केला मुलाचा खुन

दिनांक २५/०३/२०२४ रोजी रंगपंचमी असल्याने फिर्यादी नामे— सौ. सुनीता रामराव काकडे, वय ४५ वर्ष, ता. उमरेड जि. नागपूर व तिचा मुलगा सुरज रामराव काकडे, वय २८ वर्ष हे घरी हजर होते. अंदाजे दुपारी ०३.३० वा. दरम्यान फिर्यादीचे पती आरोपी रामराव काकडे, वय ५० वर्ष हा घरी दारु पिवुन आला व हॉलमधील बेडवर झोपुन फोनवर मोठमोठ्याने फोनवर बोलत होता तेव्हा हॉलमध्ये बाजेवर झोपुन असलेला फिर्यादीचा मुलगा सुरज याने फिर्यादीचे पतीस तुम्ही येथे फोनवर मोठमोठ्याने बोलु नका तुम्ही बाहेर जावुन बोला असे म्हटले तेव्हा फिर्यादीचे पती यांनी मुलगा सुरज यास ''हे माझे घर आहे तु घराचे बाहेर जा'' असे म्हणुन त्याचेशी भांडण केल्याचे कारणावरून दिनांक २५/०३/२०२४ रोजी सायंकाळी ०४.३० वा. ते ०५.०० वा. चे दरम्यान आरोपी रामराव काकडे याने मुलाचे डोक्यावर लोखंडी अळु (शेतीचे अवजार) मारुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. सदर गुन्हयात दिनांक २६/०३/२०२४ रोजी स्टे. डा. सान्हा क्र. १८ अन्वये कलम ३०७ ऐवजी भांदवि चे कलम ३०२ अन्वये कलमवाढ करण्यात आलेली आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास मा. उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर पूजा गायकवाड मॅडम करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर पूजा गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि कदम सा. पोउपनि बोळगिर, पोहवा सत्येंद्र रंगारी, नापोशि बाबा नेवारे, पोशि ओम राठोड आणि पोशि तुलाराम चटप पोहवा सुधीर राठोड यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर